भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ 58AA 450429

अ.क्र. ........ दस्ताचा प्रकार-प्रतिज्ञापत्र / करार / ........

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव : प्रा. राधाबाई काळे महिला महाविद्यालय

दुसऱ्या पक्षकाराचे नांव : ----

हस्ते असल्यास त्याचे नाव व पत्ता : निरंक

मु.वि.नोंदवही अ.नं. २७५४३ दि. 3 OCT 2023

जिल्हा कोषागार कार्यालय अहमदनगर
२० 22 SEP 2023
मु.प्र.लि.

एस. एस. गांधी, सावेडी, अहमदनगर
परवाना क्र.लायसन्स नं.२/१७/२७०९-११/१७
ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी
मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

## सामंजस्य करार

## (Memorandum Of Understanding)

"उन्नतीसाठी युवक हाच दुवा"

**रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता. जि. अहमदनगर**

**आणि**

**उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर**

रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता. जि. अहमदनगर हे सन १९८९ पासून महाराष्ट्रातील एक नामांकित व शैक्षणिक नेतृत्व करणारे महाविद्यालय आहे. 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद ' तसेच समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहचविणे हे मिशन' म्हणून प्रारंभापासूनच संस्था व महाविद्यालयाने स्विकारले आहे. संस्थाचालकांचा ध्येयवाद, शैक्षणिक दृष्टी आणि प्रयत्नातील प्रामाणिकपणा याबरोबरच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी या त्रिसूत्रीची समर्पित वृत्ती या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून महाविद्यालयाचा लौकिक वाढत गेलेला आहे. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत घेण्याची तयारी आणि जागरूक पालकांचा खंबीर पाठिंबाही यास कारणीभूत आहे. सातत्याने मेहनत घेत राहणे, वर्षानुवर्ष गुणवत्ता टिकवून ठेवणे, सातत्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करणे आणि पाल्य-पालकांत विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याचे कार्य या महाविद्यालयाने केले आहे.

कृ.मागे पहा. . २

Scanned with OKEN Scanner

सध्या सर्व विभागातून सुमारे १२०० पेक्षा अधिक विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. स्पर्धा परीक्षा विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासात भर पडत असून प्रशासकीय सेवेतील अधिकारी घडवण्याचे काम सुरू आहे.

महाविद्यालयाने समाजाच्या उन्नतीसाठी नेहमीच पुढाकार घेऊन लोकांच्या समस्या दूर करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. ज्यामध्ये व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, एड्स जनजागृती ई-पेमेंट याबाबत लोकांमध्ये जाऊन जनजागृतीच्या माध्यमाने समाजाला भेडसावणा-या अडचणी दूर करून एक सशक्त समाज उभा करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले आहेत.

रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता. जि. अहमदनगर आणि उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांच्यात एकमेकांबरोबर 'सामंजस्य करार' (MOU) दिनांक : ०३/१०/२०२३ रोजी करत आहोत.

कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. महसूल विभागाच्या योजना विद्यार्थ्यांमार्फत लोकांपर्यंत पोहचविणे.

२. शासनाच्या वेळोवेळी येणा-या लोककल्याणकारी योजनांबाबत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे:-

१. विद्यार्थ्यांनी महसूल विभागाच्या पोर्टलवरील योजना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी संवाद, पथनाट्य, समाजमाध्यमे व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करून अधिकाधिक लाभार्थींना लाभ देणे.

२. महसूल विभागाच्या सर्व योजना जास्तीत जास्त लाभार्थींपर्यंत पोहचविणाऱ्या महाविद्यालयास व प्रत्येक महाविद्यालयातील किमान ०३ विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येईल.

३. महाविद्यालय व विद्यार्थी यांच्या या उपक्रमात सहभागी कार्याची दखल घेऊन निवड करण्यासाठीची निवड समिती महसूल विभाग ठरवतील व त्याचा निर्णय बंधनकारक राहील.

अटी :-

१. महसूल विभागाच्या लोककल्याणकारी योजनांच्या प्रसार, प्रचार, प्रबोधन व अंमलबजावणी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक असून या उपक्रमात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(अ) ई-हक्क प्रणाली एका विद्यार्थ्याने किमान ०५ व्यक्तींची नोंद करावी.

ब) ई-पीक पाहणी एका विद्यार्थ्याने किमान २० लोकांची पीक पाहणी नोंदवावी. क) ई-चावडी याद्वारे एका विद्यार्थ्याने किमान १० लोकांना नोंदणीकृत करावे. ड) सलोखा योजना एका विद्यार्थ्याने किमान ०१ प्रकरण याठिकाणी नोंदवावे. इ) लक्ष्मी मुक्ती योजना एका विद्यार्थ्याने किमान १० लोकांची नोंदणी करावी. ई) मतदार नोंदणी एका विद्यार्थ्याने किमान ०५ नवीन मतदार नोंदणी करावी.

फ) दाखले प्रदान एका विद्यार्थ्याने स्वतःचे किमान ०२ दाखले तयार करून घ्यावेत.

वरील अ ते फ योजनांमधील किमान १५ लाभार्थींपर्यंत विद्यार्थ्याने पोहचणे आवश्यक आहे. याबद्दल विद्यार्थ्यांना सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व दोन क्रेडीट देण्याबाबत विचार करण्यात यावा.

२. प्रांत कार्यालयाकडून महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर व विद्यार्थ्यांना नवीन योजनांबाबत व सद्यस्थितीतील योजनांमधील दुरूस्तीबाबत प्रशिक्षण दिले पाहिजे.

३.महाविद्यालयाने योजनांची माहिती देताना येणा-या अडचणी सोडविणेसाठी मदत कक्ष स्थापन करावा. सदर कक्ष स्थापनेच्या अनुषंगाने येणारा खर्च महसूल विभाग / प्रांत अधिकारी यांच्या कार्यालयाकडून करण्यात यावा.

४. परस्पर सामंजस्य कराराचे नूतनीकरण अथवा समाप्ती एकमेकांस पूर्व सूचना देऊन केली जाऊ शकते.

समन्वयः

५. दोघांपैकी कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

६. परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२५ - २६ असा तीन (०३) वर्ष असून त्यानंतर हा करार संपुष्टात येईल.

७. परस्पर संमतीने पुढील तीन वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

८. नूतनीकरणासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

९. सामंजस्य करारानुसार होणा-या कार्यवाहीचा आढावा प्रांताधिकारी किंवा त्यांचे सक्षम प्रतिनिधी महिन्यातून किमान एकवेळा महाविद्यालय भेट देऊन घेतील.

Scanned with OKEN Scanner

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणी याबाबत रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता.जि.अहमदनगर आणि उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर यांची राहील. महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी उपक्रम अधिकारी काम पाहतील.

२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेत व कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येईल.

३. खालील स्वाक्ष-यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार (MOU) हा पुढील समन्यायिक अधिका-यात होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

| नाव | पत्ता | संपर्क | मेल आयडी |
|---|---|---|---|
| डॉ. शंकर रामचंद्र थोपटे | प्राचार्य, रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता.जि.अहमदनगर | ९५७९२२४४८८ | prinrkmm_anr@rediffmail.com |
| श्री.सुधीर पाटील | उपविभागीय अधिकारी, नगर भाग, अहमदनगर | ७७४४०४७५०० | sdonagar@gmail.com |

दिनांकः ०३/१०/२०२३

(सुधीर पाटील)
उपविभागीय अधिकारी,
नगर भाग, अहमदनगर
उप विभागीय अधिकारी
नगर भाग अ.नगर

(डॉ. शंकर रामचंद्र थोपटे )
प्राचार्य, रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, ता. जि. अहमदनगर
प्राचार्य
राधाबाई काळे महिला महाविद्यालय

Scanned with OKEN Scanner